SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

(असाधारण)

मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५

विनियम क्र. ४१/२०२५

विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना

ज्याअर्थी, उपरोक्त बाबीवर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेने विनियम क्रमांक ८/२०१९ विहीत केले आहे.

आणि,

ज्याअर्थी, सदरचे विनियमाच्या अ.क्र.३ वरील योजनेचे उपकलमाकरिता आर्थिक सहाय्य प्रदान करण्यासाठी **अ ब क ड** व **ई** नुसार तरतूद करण्यात आली आहे.

आणि,

ज्याअर्थी, अनुक्रमांक अ.क्र.३ मधील **क** मध्ये योजनेंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र, गटचर्चा ईत्यादी मध्ये संशोधन पत्रिका सादरीकरण अथवा कार्यशाळा मध्ये सहभाग याकरिता नोंदणी शुल्क, प्रवास व निवास खर्च याकरिता एकूण खर्च **रूपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त)** पर्यतच देय आहे. परंतु अक्षरात **(अक्षरी रुपये तीन हजार फक्त)** असे अनावधानाने झालेल्या चुकीमुळे दर्शविण्यात आले आहे. सदर दुरूस्ती ही विद्यापीठ विनियम क्र. ८/२०१९ मध्ये करण्यात येत आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३७ (१) मधील (द) अंतर्गत अधिष्ठाता मंडळ पुढील प्रमाणे दुरूस्ती विहित करतील.

१. सदर विनियम हे **"विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना"** विनियम क्र. ८/२०१९ विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना असे संबोधीत करण्यात येईल.
२. सदर विनियम निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.
३. विनियम क्र. ८/२०१९ च्या अनुक्रमांक ३ (क) मधील तिसऱ्या ओळीत **"(अक्षरी रूपये तीन हजार फक्त)"** या शब्दाऐवजी **"(अक्षरी रूपये पाच हजार फक्त)"** असे वाचावे.

.....